# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड जि. अहमदनगर यांच्या न्यायालयात

नियमित फौजदारी खटला क्र. ८९/२०२२ **नि.क्र. २०**

## दोषारोप

मी, व्ही. व्ही. जोशी, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड याद्वारे तुमच्यावर दोषारोप ठेवतो की,

१. उमेश श्रीधर ढगे,
वय ३० वर्ष, धंदाः शेती,

२. रमेश बबन ढगे,
वय ३० वर्ष, धंदाः शेती,

३. विलास घनशाम मोरे,
वय ४३ वर्ष, धंदा : शेती,
सर्व रा. पिंपळगांव उंडा,ता.जामखेड,जि.अहमदनगर.

**खालील प्रमाणे :-**

**पहिल्यांदा,** दिनांक ३०.०१.२०२२ रोजी रात्री ११.०० वा.सु.मौजे जामखेड शहरात ता. जामखेड येथे, तुम्ही आरोपींनी फरार आरोपी क्र. ४ बाळा हनुमंत पवार याच्यासोबत आपसात संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, फिर्यादी केशव भास्कर तोंडे व साक्षीदार बारकु दिलीप तनपुरे हे वाघ यांचे चहाचे हॉटेल समोरून मोटारसायकलवरून जात असताना त्यांची मोटारसायकल आडवून फिर्यादीस बळजबरीने पांढरे रंगाचे स्विप्ट डिझायर गाडीमध्ये बसवुन अपनयन/अपहरन केले व त्या परिणामी तुम्हीं **भारतीय दंड विधान कलम ३६३ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**दुसऱ्यांदा,** वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी फरार आरोपी क्र. ४ बाळा हनुमंत पवार याच्यासोबत आपसात संगनमत करून, तुमचा समान

उद्देश साध्य करण्याकरिता, वर नमूद फिर्यादीचे अपनयन/अपहरण करून त्यास नागेश शाळेजवळ एका रूममध्ये नेवुन त्यांना गैरपणे लपवले/परिरूध्द केले व त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ३६८ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**तिस–यांदा,**वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी फरार आरोपी क्र. ४ बाळा हनुमंत पवार याच्यासोबत आपसात संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, फिर्यादी केशव भास्कर तोंडे व साक्षीदार यांच्या मृत्यूस कारण होण्याचा संभव आहे असे 'लाकडी दांडके, लोखंडी पाईप व सत्तुर' हे हल्ल्याचे हत्यार म्हणून वापरुन सर्व आरोपींनी वरील नमूद फिर्यादीच्या पायावर, हातावर व पाठीवर तसेच आरोपी क्र.१ ने लोखंडी सत्तुरने फिर्यादीचे डोक्यामध्ये उजवे कानाचे वर मारून इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली, आणि त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ३२४ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**चौथ्यांदा,** वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी फरार आरोपी क्र. ४ बाळा हनुमंत पवार याच्यासोबत आपसात संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता तुम्ही आरोपी व फरार आरोपीने वरील नमूद फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्यास इच्छापूर्वक दूखापत पोहचविली व त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ३२३ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**पाचव्यांदा,** वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी फरार आरोपी क्र. ४ बाळा हनुमंत पवार याच्यासोबत आपसात संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, वर नमूद फिर्यादी मोटारसायकल रस्त्यात अडवून त्याला गैरपणे निरुध्द केले त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ३४१ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**सहाव्यांदा,** वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी फरार आरोपी क्र. ४ बाळा हनुमंत पवार याच्यासोबत आपसात संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, वरील नमूद फिर्यादीस बेकायदेशीरपणे लपवले/परिरूध्द केले व त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ३४२ सह कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**सातव्यांदा,**वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी फरार आरोपी क्र. ४ बाळा हनुमंत पवार याच्यासोबत आपसात संगनमत करून, तुमचा समान

उद्देश साध्य करण्याकरिता, वर नमूद फिर्यादी व साक्षीदाराकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अगर अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने त्यावंना शिवीगाळ करुन, अपमानीत करुन, उद्युक्त केले व त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ५०४ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**आठव्यांदा,**वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपींनी फरार आरोपी क्र. ४ बाळा हनुमंत पवार याच्यासोबत आपसात संगनमत करून, तुमचा समान उद्देश साध्य करण्याकरिता, तुम्ही आरोपी क्र.२ ने वर नमूद फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्या परिणामी तुम्ही **भारतीय दंड विधान कलम ५०६ सह वाचनिय कलम ३४** नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

**शेवटी,** वरील नमूद दिनांक, वेळी व स्थळी, तुम्ही आरोपी क्र. ३ ने वरील नमुद फिर्यादीसोबत झालेल्या व्यवहारावरुन अप्रत्यक्षरित्या व्याज स्वीकारुन अनुज्ञाप्ती शिवाय सावकारी व्यवसाय केला व परिणामी तुम्ही महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ३९ नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

मी याद्वारे तुम्हाला निर्देश देतो की, वरील दोषारोपासाठी तुमची या न्यायालयाकडून संपरीक्षा घेण्यात यावी.

दिनांकः ०९/०१/२०२४ (व्ही. व्ही. जोशी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड

दोषारोपातील मजकूर आरोपींना मराठी भाषेत वाचून दाखविण्यात आला व समजून सांगण्यात आला, ज्याकरिता आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे व संपरीक्षा घेण्याचे कथन केले.

दिनांकः ०९/०१/२०२४ (व्ही. व्ही. जोशी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड